# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in

( महसूल शाखा )

---

वाचले:- १. मे. पुजा ॲंड पुनम बिल्डर्स, नवनीत भवन, शारदाश्रम जवळ, भवाणी शंकर रोड, दादर, मुंबई-४०००२८ यांचेकडील दि.११/०८/२०१७ रोजीचा अर्ज.
२. मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ मधील कलम २९
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. गौखनि-१०/१००९/प्र.क्र.३०९/ख, दि. ११/०२/२०१०
४. महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग, दि. ११ मे २०१५.
५.परिरक्षण भूमापक, मुंबई शहर यांचेकडील स्थळपाहणी अहवाल दि. २३/८/२०१७

---

क्र.सीएसएलआर/मशा-२/आ.क्र.२६०५९/प्र.क्र.१०८८/
माहिम टिपीएस IV/भूकर क्र.४४२/गौ.ख.प./२०१७ /320
दिनांक :- /०८/२०१७

31 AUG 2017

विषय : <u>जमीन : मुंबई शहर</u>
माहिम टिपीएस IV विभागातील एफपी. क्र. ४४२ या मिळकतीमधून खोदकाम करुन गौणखनिज उत्खननास परवानगी मिळणेबाबत.

**आदेश :-**

मे. पुजा ॲंड पुनम बिल्डर्स यांनी उपोद्घातातील १ प्रमाणे या कार्यालयास दि.११/०८/२०१७ रोजीचे अर्जाने **माहिम टिपीएस IV** महसूल विभागातील **एफ. पी. क्र. ४२२** मुंबई या मिळकतीमधून एकूण **९४० ब्रास** गौणखनिजे **काढण्यास** परवानगी मागितलेली आहे. अर्जदार यांनी सदर पत्रासोबत लागणारी कागदपत्रे जोडलेली आहे. तसेच त्यांनी **रक्कम रु. ३,७८,०००/- चा भरणा Online ग्रास प्रणालीने, GRN No – MH००४६०६६७४२०१७१८E, दि. १८/०८/२०१७ भरणा** केलेला आहे. अर्जदार यांनी अर्ज शुल्क र. रु.२०००/- भरणा स्वामित्वधनासोबतच केलेला आहे.

सबब गौण खनिज काढण्यास सादर केलेल्या कागदपत्रास अनुसरुन मे. पुजा ॲंड पुनम बिल्डर्स यांना वर नमूद जमिनीमधून खोदकाम करुन ९४० ब्रास गौण खनिज (मुरुम, दगड व माती काढणेस) उत्खननास मी श्री. बन्सी गवळी, अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ मधील नियम २९ व महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग, दि. ११ मे २०१५ प्रमाणे मला प्राप्त अधिकारानुसार खालील अटी व शर्तीवर परवानगी देत आहे.

१. सदरचे जमिनीचे खोदकाम करतांना लगतचे जमिनीवरील इमारतीला कोणताही धोका पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबत अर्जदार यांनी या कार्यालयाकडे सादर केलेल्या बंधपत्राचे पालन करावे.
२. खोदकाम केल्यानंतर उत्खननाने निघालेली माती अगर इतर गौणखनिज कोणत्याही शासकीय जमिनीवर टाकण्यात येवू नये. उत्खनन केलेली माती ज्या जागेवर टाकणार आहेत, त्या जागेच्या मालकाची परवानगी घ्यावी. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांची परवानगी घ्यावी.
३. उत्खननाबाबत या आदेशापासून <u>दोन</u> महिन्याची मुदत देण्यात येत आहे.

४. मंजूर केलेल्या गौणखनिजापेक्षा जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास दंडनिय कारवाई करण्यात येईल.

५. मुदतीत उत्खनन झाल्याचा अहवाल अर्जदाराने सादर करावा व त्याप्रमाणे या कार्यालयाचे प्रतिनिधिमार्फत प्रमाणित करावे.

६. उत्खनन करण्यास परवानगी दिलेली आहे त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही जागेतून उत्खनन करु नये. तसे आढळल्यास दंडनिय कारवाई करण्यात येईल.

७. कांदळवनावर भराव केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. मुदतीत काम पूर्ण न झाल्यास पुढील मुदतवाढ मिळणार नाही.

(बन्सी गवळी) 29/8/2017
अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर

प्रत :-

१. मे. पुजा ॲंड पुनम बिल्डर्स, नवनीत भवन, शारदा श्रम जवळ, भवाणी शंकर रोड, दादर, मुंबई-४०००२८

२. मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहितीसाठी सादर.

३. श्री. सी. एफ. जयस्वार, अव्वल कारकून, महसूल शाखा

२/- आपणास यापूर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे या कार्यालयाचे पथकामार्फत वरचेवर स्थळपाहणी करुन परवानाधारक यांनी केलेल्या गौणखनिजांचे उत्खननाची मोजमापे घेऊन जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास दंडनिय कार्यवाही करण्यात यावी.

31 AUG 2017

31/8/2017